सकाळ

# विद्या प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांकडून सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती

**बारामती, ता. १४ :** येथील विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांच्यावतीने सुरू असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती केली.

महाविद्यालयातील विद्यार्थी, सुभद्र मॉलमध्ये उपस्थित नागरिक यांना विविध योजनांमध्ये सहभागी होताना ऑनलाइन फसवणूक होणार नाही यासाठी घ्यायची काळजी याबद्दल मार्गदर्शन केले.

काही योजनांमध्ये कशाप्रकारे सायबर हल्ले होत आहेत हे पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांनी सादरीकरण करून नागरिकांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच कशा पद्धतीने सायबर फसवणूकीपासून दूर राहावे, हे त्यांनी पथनाट्याद्वारे सांगितले.

अक्षय भोसले यांनी शिक्षक समन्वयक म्हणून काम पाहिले.

प्राचार्य डॉ. भरत शिंदे, उपप्राचार्य डॉ. श्यामराव घाडगे, डॉ. लालासाहेब काशीद, विभाग प्रमुख महेश पवार, विशाल शिंदे, अनिल काळोखे, पूनम गुंजवटे, वैशाली पेंढारकर, शुभांगी निकम, अक्षय शिंदे यांनी परिश्रम घेतले.



**बारामती :** पथनाट्याद्वारे सायबर सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करताना विद्या प्रतिष्ठानचे विद्यार्थी.